# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. ०१/१२/२०२१**

बुधवार दि. ०१/१०/२०२१ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०६ दि. २३/११/२०२१ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता Video Conferencing द्वारे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सभागृह नेता |
| ४) | जैन दिनेश तेजराज | सभापती, स्थायी समिती |
| ५) | पाटील प्रविण मोरेश्वर | विरोधी पक्षनेता |
| ६) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ७) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ८) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| ९) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १०) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| ११) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १२) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १३) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १४) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १५) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| १६) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| १७) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| १८) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| १९) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २०) | जैन गीता भरत | सदस्या. |
| २१) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| २२) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २३) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| २४) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| २५) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| २६) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| २७) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| २८) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २९) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३०) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ३१) | पाटील वंदना विकास | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३२) | डिम्पल विनोद मेहता | सदस्या |
| ३३) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ३४) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ३५) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ३६) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ३७) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ३८) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ३९) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ४०) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ४१) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ४२) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ४३) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ४४) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ४५) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ४६) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ४७) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ४८) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ४९) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ५०) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ५१) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५२) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ५३) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ५४) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ५५) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ५६) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ५७) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ५८) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ५९) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ६०) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ६१) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ६२) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ६३) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ६४) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ६५) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ६६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ६७) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ६८) | शर्मा भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ६९) | ॲड शफीक अहमद सादत खान | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | भोसले अनिल बाबुराव | नामनिर्देशित सदस्य |
| ७१) | अजित भगवान पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ७२) | सिंह विक्रमप्रताप रमाप्रती | नामनिर्देशित सदस्य |

<u>गैरहजर सदस्य -</u>

| | | |
|---|---|---|
| १) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| २) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ३) | पाटील  रोहिदास शंकर | सदस्य |
| ४) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| ५) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| ६) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| ७) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ८) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| ९) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| १०) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ११) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| १२) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| १३) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| १४) | शेख अमजद गफार | सदस्य |
| १५) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| १६) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| १७) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| १८) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| १९) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| २०) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| २१) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| २२) | भोईर भावना राजू | सदस्या |
| २३) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| २४) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| २५) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| २६) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |

रजेचा अर्ज - निरंक

**मा. महापौर :-**

सचिव साहेब सभेच्या कामकाजाला सुरुवात करा.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, आपली ही आज होणारी महासभा सचिवांनी ह्या अगोदर आपल्याला ही महासभा प्रत्यक्ष आपण सभागृहात घेणार अशा प्रकारचे परिपत्रक आपल्या सर्व सन्मा. सदस्यांना देण्यात आले होते. आणि त्यानंतर हा काय दुसरा व्हायरस ह्या ठिकाणी आलेला आहे आणि त्यामुळे शासनाने आणि आपल्या प्रशासनाने त्याची खबरदारी घेतलेली आहे. आणि म्हणून ....

**मा. महापौर :-**

दळवी साहेब तुम्हाला नंतर बोलायला देते पहिला सचिव साहेबांना सभेला सुरुवात करु देत. नंतर तुम्हाला बोलायला देते.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा बुधवार दि. ०१/१२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, मी सुरुवातीला तेच म्हणत होतो की ऑफलाईन सभा व्हावी म्हणून सचिवांनी आपल्या सर्व सन्मा. सदस्यांना परिपत्रक दिले होते आणि त्यानुसार ही ऑफलाईन सभा होणार होती, परंतु ह्या दुसऱ्या व्हायरसने डोक वर काढल्यामुळे ह्याठिकाणी शासनाचे ह्या तीन दिवसा अगोदर परिपत्रक आलेले आहे की ह्या ठिकाणी तुम्ही 50 टक्केच्या क्षमतेपर्यंत तुम्ही ही ऑफलाईन सभा घेवू इच्छीतात. आणि म्हणून ही आज होणारी प्रत्यक्ष महासभा ती आपण रद्द करुन ऑनलाईन पध्दतीने ह्या ठिकाणी सुरुवात करत आहोत. पण महापौर मॅडम ह्याठिकाणी ऑनलाईन सभा घेत असताना काही तांत्रिक अडचणीला आपण सामोरे जात आहोत. प्रत्येक वेळेला आपणही पाहतात की सन्मा. सदस्यांना त्याठिकाणी कधी मायीक ऑफ असतो किंवा बंद असतो कधी नेटवर्क नसते तर ह्या सगळ्या प्रत्येक वेळेला ह्या सगळ्या गोष्टीला आपल्याला त्याठिकाणी सामोरे जावच लागत आहे. आणि म्हणून महापौर मॅडम सर्व सन्मा. सदस्यांची ती इच्छा राहिलेली आहे की आपण शासनाने जे काही आपल्याला नियम घालुन दिलेले आहेत त्या नियमाचे पालन करुन आपण ऑफलाईन सभा घेण्यात यावी आणि म्हणून महापौर मॅडम, माझी एक प्रामुख्याने आपणास विनंती राहील की आपणही शासनाचे हे सर्व नियम पाळून शासनाच्या अटी नियमानुसार आपण दुसऱ्या ठिकाणी हॉलमध्ये ह्याठिकाणी आपले जे नगरसेवक आहेत त्याठिकाणी त्यांची व्यवस्था होईल अशा प्रकारे व्यवस्था करावी आणि त्याठिकाणी ही सभा ऑफलाईन आयोजित करण्यात यावी यापुढे अशी आपणास मी विनंती करतो आणि ही आजची सदरची महासभा ही आज तहकुब करावी अशी मी आपणास विनंती करतो महापौर मॅडम.

**जुबेर इनामदार :-**

आमचे अनुमोदन आहे.

**प्रशांत दळवी :-**

जुबेर साहेबांनी अनुमोदन दिलेले आहे. महापौर मॅडम आपण ह्या संदर्भात रुलींग द्यावे.

**नगरसचिव :-**

आपण तीन व्यक्तिंना सत्कारासाठी आज पत्र दिलेले आहे सभागृहामध्ये सत्कार करण्याचे त्यांना कळविलेले आहे त्या निमित्ताने ते उपस्थित आहेत.

**मा. महापौर :-**

त्यांना बोलवा.

**नगरसचिव :-**

कुमारी सानिका परेश पाटील त्यांनी आपल्या खेळाच्या जोरावर आतापर्यंत मुंबई उपनगर संघ, महाराष्ट्र राज्य संघ, आदी संघात आपले स्थान पटकविलेले आहे. आणि तिच्या कामगीरीमुळे राज्य स्थरावर देखील मिरा भाईंदरचे नाव उंच्चावले आहे. सानिका ही पेंकरपाडा परिसरात राहत असुन तिच्या कामगीरी मुळे अनेक मुले मुली प्रेरीत झाले आहेत त्यामुळे त्यांचा कल कबड्डीकडे वाढलेला आहे. त्यामुळे आज तिचे त्यानिमित्ताने महापौरांच्या हस्ते स्वागत करण्यात येत आहे. आणि

अभिनंदन करण्यात येत आहे सत्कार करण्यात येत आहे. सानिका परेश पाटील हीला महापौरांच्या हस्ते सन्मान चिंन्ह आणि पुष्पगुच्छ देवून तिचा सत्कार करण्यात येत आहे. त्यानंतर कु. नमन सुशिल बजाज हा मुलगा महाविद्यालयीन विद्यार्थीने पुणे येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात एस.आर. काजळे बेस्ट आऊटगोईंग मेकॅनिकल इंजिनियर व सर्वोत्कृष्ठ आऊटगोईंग विद्यार्थी हा माणाचे समजले जाणारे पुरस्कार पटकाविलेला आहे. तसेच सदर महाविद्यालया मार्फत कोविड-19 कार्यकाळात सामाजिक कार्य केल्या बद्दल त्याला सन्मान पत्र देवून गौरवण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्राचे उच्चतंत्र शिक्षण मंत्री उदय सावंत यांच्या हस्ते त्यांनी केलेल्या त्यांचा कोविड संशोधनासाठी पुरस्कार देवून त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. त्या कारणसाठी आज त्याचा कु. नमन सुशिल बजाज याचा महापौरांचा हस्ते त्याचा सत्कार करण्यात येत आहे. त्याला पुष्पगुच्छ आणि सन्मानचिंन्ह देवून त्याचा सत्कार करण्यात येत आहे. त्यानंतर वृद्र कपिल ठाकुर, यांनी सी.एस.ई.टी. या परिक्षेत 200 पैकी 190 गुण पटकावून यश संपादन केलेले आहे. वृद्र कपिल ठाकुर हे 12 वी कॉमर्स शाखेचे विद्यार्थी आहेत. या परिक्षेत एकुन 39 हजार 823 विद्यार्थांनी भाग घेतलेला होता त्यामध्ये यांनी सर्वात प्रथक क्रमांक मिळवलेला आहे आणि त्यामुळे मिरा भाईंदर शहराचे नाव लौकीक वाढलेले आहे. 6 वर्षा नंतर 7 व्या बॅच मध्ये प्रथमच महाराष्ट्रातील पहिली व्यक्ती ज्याने देशात प्रथम क्रमांक पडकाविलेला आहे. हा सेवन इलेव्हन स्कुलचा विद्यार्थी आहे आणि याचा सत्कार मा. महापौरांच्या हस्ते सन्मान चिंन्ह आणि पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आलेला आहे. धंन्यवाद.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, सत्कारमुर्तींचे अभिनंदन परंतु याच्या पुर्वी देखील आपल्याकडे काही नाव दिलेली आहेत त्यांचा अद्याप तिथे सत्कार झालेले नाहीत. तर आपण त्याची दखल घ्यावी.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, गटनेत्या निलमताई ढवण यांची जी सुचना मांडलेली आहे कोण सत्कारमुर्ती असतील त्यांना पुढच्या बैठकीत बोलविण्यात यावे.

**नगर सचिव :-**

निलम ढवण मॅडम आपण पत्र दिलेले आहे का ?

**निलम ढवण :-**

केव्हाच दिलेले आहे त्याला दोन वर्ष झाली.

**नगरसचिव :-**

ठिक आहे आपण पुढच्या बैठकीमध्ये त्यांना घेवूया.

**मा. महापौर :-**

पुढच्या बैठकीमध्ये त्यांना सन्मानित करुया.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, जी घोषना दिलेली आहे आमचे एक लेटर आहे त्याची कृपया घोषना करावी.

**नगरसचिव :-**

मा. पिठासिन अधिकारी यांच्या मान्यतेने शिवसेना गटनेता, सौ. निलम हरिश्चंद्र ढवण यांनी विरोधी पक्षनेता पदासाठी दि. 16/11/2021 रोजी पत्र दिलेले आहे मा. महापौर मॅडम यांच्याकडे विरोधी पक्षनेता श्री. प्रविण मोरेश्वर पाटील यांनी विरोधी पक्षनेते पदाचा राजिनामा देत असुन त्यांच्या जागेवर श्री. धनेश परशुराम पाटील यांना विरोधी पक्षनेता पद देणेसाठी किंवा ह्यांची नेमणूक होण्याच्या दृष्ट्रीने त्यांनी शिफारस केलेली आहे गटनेता निलम हरिश्चंद्र ढवण यांनी आणि त्याची घोषना मा. महापौर करत आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. नगरसेवक श्री. धनेश परशुराम पाटील यांची विरोधी पक्षनेता पदासाठी आजच्या सभागृहामध्ये मान्यता देत आहे. श्री. धनेश परशुराम पाटील यांचे ह्या सभागृहामध्ये मी अभिनंदन करत आहे. सन्मा. सदस्य आणि सभागृहनेते प्रशांत दळवीजी यांनी तहकुबीची सुचना मांडलेली आहे. तसेच सन्मा. नगरसेवक गटनेते जुबेर इनामदारजी यांनी त्याला अनुमोदन दिलेले आहे. नगरसेवकांना ऑनलाईन बैठकीमध्ये अडचणी निर्माण होत आहे अशी त्यांची सुचना होती त्यांना नगरसेवकांना आपले प्रश्न व्यवस्थितरित्या मांडता येत नाही असेही त्यांनी सुचविलेले आहे म्हणून आजची ही सभा तहकुब करण्याआधी सन्मा. आयुक्त महोदय यांना सभागृहामध्ये काही विषयाबद्दल बोलायचे आहे त्यांनी आपले संभाषण सुरु करावे.

**मा. आयुक्त :-**

सर्वांना नमष्कार मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आजादीका अमृत महोत्सव अर्थात भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत राज्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करणेबाबत असा 28 सप्टेंबर 2021 रोजी महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग यांच्याकडून शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे त्याअनुषंगाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दिनांक 12 मार्च 2021 पासुन 75 आठवडे 12 मार्च 2021 पासुन सलग 75 आठवडे ह्या कालावधीत देशभरात विविध कार्यक्रम आणि उपक्रमा द्वारे आयोजित करण्यास सुचित केलेले आहे. सदर कार्यक्रम माहे ऑगस्ट 2023 पर्यंत आयोजित करण्याचे मा. केंद्रशासनाचे आणि शासनाने तदनंतर कळविलेले आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने केंद्रशासनाच्या मा. पंतप्रधान महोदय यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीच्या धर्तीवर राज्यामध्ये देखील अशी समिती स्थापन करणेबाबत कळविलेले आहे. ह्या अनुषंगाने वेगवेगळे प्रकारचे कार्यक्रम एकुन 75 आठवड्यात आपल्याला करावयाचे आहेत. यामध्ये सांस्कृतीक अभियान आहे त्याच प्रमाणे नागरीक स्थानिक स्वराज्य संस्था मधील कार्यक्षेत्राशी संबंधित स्थळांचे पुतडांची डागडूगी, रंगरंगोटी करणे, मासिक बैठकीची माहिती देणे, हे एक अभिप्रेत आहे. त्याच बरोबर भिंती चित्र, माहिती पत्रके, हे देणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे बैठकी द्वारे वेगवेगळी माहिती द्यायची याअनुषंगाने सभा, आमसभा, क्षेत्रीय सभा, अशा आयोजित करून माहिती घेणे आहे. सक्षम अभियान यामध्ये नागरीक स्थानिक संस्था मधील डेव्हाय.एन.एल.एम.यु. मध्ये अंतर्गत शहर स्तरीय संघ, वस्ती स्तरीय संघ, बचत गट, प्रत्येक महिन्याला ह्या विषयावर प्रशिक्षण आयोजित करणे अपेक्षित आहे. जनमैत्री अभियान, प्रश्न मंजुशा स्पर्धा, सुरक्षा अभियान, प्रभात फेरी, त्याच प्रमाणे आरोग्य तपासणी असे वेगवेगळे कार्यक्रम येत्या वर्षभरात आपण राबवणार आहोत आणि 15 ऑगस्ट 2023 ह्यावेळी राज्य भरातुन जे जे प्रोग्राम राबविलेले आहेत ते केंद्र सरकारकडे माहिती जाणार आहे. आणि आजादीका अमृत महोत्सव 15 ऑगस्ट 2023 यावेळी तो पुढील कार्यक्रम मा. केंद्र सरकारच्या सुचने नुसार आदेशा नुसार त्यावेळी जाहिर करण्यात येतील. तोपर्यंत ह्या वर्षात आपल्याला सर्व जे मा. केंद्र सरकार मा. राज्य शासनाने ज्या ज्या सुचना दिलेल्या आहेत त्याची आपण आजादीका अमृत महोत्सव या कार्यक्रमात अंमलबजावणी करणार आहोत. धंन्यवाद.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त महोदय, सर्व नगरसेवकांची इच्छा सभागृहनेते आणि सन्मा. गटनेते जुबेर इनामदारजी यांनी ह्या सभागृहात मांडलेले आहे की ऑनलाईन सभा घेणे करीता बऱ्याच अडचणी होतात नगरसेवकांना आपले प्रश्न व्यवस्थितरित्या मांडता येत नाहीत आणि त्याच्यामुळे ही ऑनलाईन सभा जी आहे ही पुढच्या वेळेला ऑनलाईन नघेता मोठ्या सभागृहामध्ये किंवा मोठ्या हॉलमध्ये ऑफलाईन कशा पध्दतीने घेता येईल याकरीता प्रशासनाची तयारी असावी. आणि आपण त्यासाठी आजची ही सभा तहकुब करत आहोत.

**सभा तहकुबी ठराव क्र. 55 :-**

सर्व नगरसेवक, सभागृहनेते आणि सन्मा. गटनेते जुबेर इनामदारजी यांनी ह्या सभागृहात मत मांडलेले आहे की ऑनलाईन सभा घेणे करीता बऱ्याच अडचणी होतात. नगरसेवकांना आपले प्रश्न व्यवस्थितरित्या मांडता येत नाहीत आणि त्याच्यामुळे ही ऑनलाईन सभा जी आहे ही पुढच्या वेळेला ऑनलाईन न घेता मोठ्या सभागृहामध्ये किंवा मोठ्या हॉलमध्ये ऑफलाईन कशा पध्दतीने घेता येईल याकरीता प्रशासनाची तयारी असावी आणि त्यासाठी आजची ही सभा तहकुब करत आहोत.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सभा तहकुब झाल्याची वेळ दु. 12.27 वाजता)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका